CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol. II , 10th March 2018 | UGC Approved Sr. No. 64310 | ISSN : 2319 - 8648 Impact Factor : 2.143

# जागतिकीकरण आणि सामाजिक न्याय

डॉ. संजय काळे
*दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि. नांदेड.*

------------- (55) -------------

**प्रस्तावना :**

सन १९९१ मध्ये भारताने स्विकारलेल्या नविन आर्थिक धोरणाचे एक महत्वाचे अंग म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण म्हणजे अशी प्रक्रिया की ज्या प्रक्रियेमध्ये वस्तू व सेवा, भांडवल तंत्रज्ञान आणि श्रम यांची देवाण - घेवाण मुक्तपणे होण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रीकरण केले जाते. यासाठी वरील चारही बाबीच्या मुक्त संचारावारील निर्बंध व नियंत्रणे दूर केली जातात याचाच अर्थ सरकारचा बाजार व्यवस्थेच्या कार्यातील हस्तक्षेप कमी केला जातो व बाजारातील इशाऱ्यानूसार वरील चारही बाबींची मुक्तपणे ने आण केली जाते. (१) सन १९९१ च्या आर्थिक सुधारणांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा सांधा जागतिक आर्थकारणाशी जोडला गेला. या आर्थिक सुधारणांची उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण हे महत्वपुर्ण पैलू असून यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल व त्याचे लाभ सर्व भारतीयांना मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात आली होती.

बाजरपेठी अर्थव्यवस्थेच्या भांडवलशाही दृष्टीकोणानुसार सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) वाढीवर भर दिला जातो. अशा प्रकारच्या वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात नक्कीच वृध्दी होते आणि दरडोई उत्पन्नतही वाढ होते. मात्र या वाढीमुळे उत्पन्न आणि संपत्ती बाबतच्या विषमतेलाही चालना मिळते. विकास आवश्यक आहेच पण तो दारिद्रय, भौतिक सुविधांचा आणि संधीचा अभाव तसेच भेदभाव या पारंपारिक प्रश्नावरील एकमेव उतारा ठरु शकत नाही. विकासाची धोरणे राबवतांना ती सर्व समावेशक ठेवण्याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. या धोरणामुळे लोकांच्या किमान गरजा भागल्या पाहिजेत आणि सामाजिक न्यायाचे तत्वही साध्य झाले पाहिजे. (२)

**● जागतिकीकरणाचा अर्थ :**

"जगातील सर्व राष्ट्राची एक बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधन सामग्रीचे आणि भांडवलाचे सहजतेने परिचलन निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय"

**श्रमवन कुमारसिंग**

अर्थव्यवस्थेला बंदिस्ताकडून मुक्ततेकडे नेणारे आर्थिक धोरण म्हणजे जागतिकीकरण होय.

**● सामाजिक न्याय :**

सामाजिक न्यायाच्या विषयी विभिन्न समाजात वेगवेगळे मुल्य आणि धारणा प्रचलित आहे. या संबंधी स्पष्ट असा आधार किंवा मापदंड मिळत नाही. प्रत्येकजन आपल्या दृष्टीकोणातून याची परिभाषा करित असतो त्यामुळे सामाजिक न्यायाची व्याख्या करणे एक जटील काम आहे, परंतु सामाजिक न्यायाच्या संदर्भात एक गोष्ट निश्चित स्वरुपात स्विकारली जाते त्याचा थोडक्यात सार म्हणजे वितरणात्मक न्याय हा आहे. सामाजिक न्याय समाजाद्वारे आपल्या अधिकाराच्या वितरणाच्या प्रक्रियेशी संबंधीत आहे. हे समाजाच्या त्या प्रक्रियेमध्ये निहित आहे ज्याच्याद्वारे समाज मुल्य आणि अधिकार नागरीकांमध्ये अधिकांश रुपात वितरित करतो. (३)

सामाजिक न्यायाच्या संदर्भात काही लोक प्रसिध्द साम्यवादी विचारवंत कार्ल मार्क्स यांच्या विचाराला आधार मानुन व्याख्या करतात. मार्क्सच्या मतानुसार, **"जेव्हा प्रत्येक व्यक्तीकडून त्याच्या योग्यतेनुसार काम करुन घेतले जाईल व गरजेनुसार मोबदला दिला जाईल तेव्हा सामाजिक न्याय प्रस्थापित होईल"**. परंतु या विचारालाही सामाजिक न्याय प्राप्त करण्यासाठी स्विकार केले जाऊ शकत नाही, कारण यामध्ये योग्यता आणि गरजा यांचे मापदंड काय आहे अणि याचे निर्धारण कसे असावे हे स्पष्ट होत नाही. यामध्ये राज्याच्या भुमिकेला पुर्णतः नाकारलेले आहे. परंतु हे विधितच आहे की, वर्तमान राज्याचा आधार सामाजिक न्याय आहे. तसेच राज्याच्या सहकार्याशिवाय सामाजिक न्याय प्रस्थापित करणे असंभव आहे. जरी मार्क्सच्याद्वारे समाजाच्या संदर्भात खुपच व्यापक आणि विकासवादी दृष्टीकोणाचा

स्विकार केला गेला आहे, परंतु त्यांच्याद्वारे प्रदान केलेल्या विचाराच्या आधारावर वर्तमान समाजाची जटील अशा सामाजिक आणि आर्थिक वास्तविकतांना समजू शकत नाही. ही वास्तविकताच सामाजिक न्यायाच्या निर्धारक तत्वांचे काम करते. (४)

सामाजिक न्यायाच्या संदर्भात वर्तमान काळात जॉन रॉल्सचा सिध्दांत अधिक प्रासंगिक वाटतो. रॉल्सच्या मतानुसार ***राज्याचा आधार हा ना अधिकाराचे रक्षण करणे हा आहे , ना अधिकाधिक व्यक्तींचे अधिकाधिक सुख हे आहे, तर राज्याचा आधार सामाजिक न्याय हेच आहे***. रॉल्सच्या मतानुसार सामाजिक न्याय दोन प्रमुख सिध्दांतावर आधारीत आहे. पहिले म्हणजे समाज काही अशा नियमाद्वारे संचलित केले जाते किंवा नियंत्रित केले जाते ज्या आधारावर समाजात परिवर्तन केले जाऊ शकते. दुसरे म्हणजे समाजामध्ये एक अशी संस्था असु शकते किंवा असायला पाहिजे की हे परिवर्तन आणू शकेल. मुलतः ही संस्था राज्य आहे. तसेच याच्या माध्यमातून समाजातील व्याप्त साधनांच्या वितरणातील असमानता समाप्त केली जाऊ शकते. रॉल्सने याला परिभाषीत करतांना म्हटले आहे की, "असे सर्व सामाजिक प्राथमिक वस्तू (स्वंतंत्रता आणि संधी, उत्पन्न आणि संपत्ती) सर्व समान रुपात वितरीत झाले पाहिजे, जोपर्यंत यापैकी कोणतीही किंवा सर्व वस्तुंचे असमान वितरण सर्वात कमी लाभान्वित व्यक्तीच्या हितामध्ये असेल". अर्थात स्वतंत्रता, उत्पन्न, संपत्ती आणि संधी इत्यादी सर्व प्राथमिक बार्बीना कोणताही भेदभाव न बाळगता वितरीत केले पाहिजे हाच सामाजिक न्याय आहे. जर या वितरणामध्ये काही भेदभाव असेलच तर तो भेद केवळ त्याच स्थितीमध्ये केला पाहिजे की, ज्यामध्ये समाजातील सर्वात कमी उत्पन्न असणाऱ्यांना लाभ मिळाला पहिजे. (५)

दुसऱ्या महायुद्वानंतर भारतासह जगातील अनेक देश गुलामगीरीतून मुक्त झाले. स्वातंत्र्य, न्याय, समता आणि अधिकार या तत्वाचा स्विकार करण्यात आला. **लोकशाही** हाच मुळ आधार मानून मागास, उपेक्षित, दलित व अल्पसंख्यांक यांच्या विकासासाठी सामाजिक न्यायाच्या स्थापनेवर भर देण्यात आला. भारतासारख्या विकसनशिल देशात सामाजिक न्यायाची संकल्पना मुळ धरत असतांनाच भारतासह जगातील बहुतांश देशांनी जागतिकीकरणाचा स्विकार केला. भारतातील समाजव्यवस्था हजारो वर्षापासून वर्णव्यवस्थेने प्रभावित होवून शोषित व मागासलेली होती. संपूर्ण समाज व्यवस्थाच विषमतेवर आधारित होती. अशा समाजव्यवस्थेमध्ये स्वातात्र्यानंतर सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या हेतुने राज्यघटनेत मुलभुत अधिकाराच्या माध्यमातून मागास वर्गापासून ते महिला पर्यत सुरक्षा प्रदान करुन संधी व अधिकार देवून न्याय प्रस्थापित करण्यासाठी व त्यांना समाजाच्या मुळ प्रवाहात आणण्यासाठी प्रक्रीया सुरु होती. मागासवर्गीय लोकांना आर्थिक लाभा प्राप्त होण्यासाठी नोकर, उद्योग व शिक्षण यामध्ये विशेष सवलती दिले जात असल्यामुळे देशातील खालच्या स्तरातील वर्ग विकासाच्या प्रवाहात प्रतिनिधित्व करीत होता. सामाजिक न्यायाची संकल्पना खऱ्या अर्थाने मुळ धरत असतांना जागतिकीकरणाच्या संकल्पनेने संपुर्ण जगात जोर धरला त्याचा परिणाम भारतासारख्या विकसनशिल देशातील मागासलेल्या वर्गावर मोठया प्रमाणावर पडण्याची संभावना निर्माण झाली. (६)

भारतासारख्या देशात नोकरी व शिक्षण या क्षेत्रात मागासवर्ग व महिला यांना राखीव जागा देवून त्यांना समाज विकासात आणून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले जात होते. त्यास जागतिकीकरणाच्या प्रभावाने बंधने येण्याची संभावना निर्माण झाली. कारण खाजगी उद्योग व शिक्षण हे बाहेरील देशाच्या नियंत्रणात काम करतात. त्यामुळे भारतासारख्या लोकशाही देशातील व्यवस्थेच्या धोरणाचा ते स्विकार करणार नाहीत. सामाजिक न्यायाच्या स्थापनेसाठी भारतीय संविधानाने जे कायदे केले आहेत त्याची अमलबजावणी करण्यासाठी विदेशी कंपन्या, व्यापार व शिक्षण व्यवस्था बांधील राहणार नाहित आणि त्यावर भारतातील समता, न्यायाची संकल्पना प्रस्थापित करण्याचे कोणतेही दायीत्व राहणार नाही (७)

**●सारांश :**

जागतिकीकरणामुळे विकसनशिल देशाचा वेगाने विकास होईल असे वाटत होते, पण तसे झाले नाही. मर्यादीत अर्थाने केवळ शहरी भागाचा विकास झाला. उच्च शिक्षित मध्यम वर्गाला आकर्षक पॅकेजचा रोजगार मिळून त्यांचे राहणीमान उंचावले परंतू बहूसंख्य अशा सामान्य वर्गाला जागतिकीकरणाने काय दिले हा खरा प्रश्न आहे. जागतिकीकरणामुळे शेती, पशुपालन व ग्रामीण उद्योग आडचणीत आले.

यांत्रीकीकरण व स्वयंचलीत प्रक्रीयांकडे कल वाढला. त्यामुळे ग्रामीण भागात पुर्वीसारखे काम राहिले नाही. उत्पादन वाढत गेले परंतू उत्पारनातील वाढ रोजगाराशी सुसंगत नसल्यामुळे बेराजगारीत वाढ झाली. जागतिकीकरणामुळे आर्थिक विषमतेत वाढ झाली. व्यापक लोककल्याणाचा अविभाज्य भाग म्हणजे समता किवा सर्वांचे राजकीय, नागरी आणि आर्थिक हक्क समान पातळीवर आहेत अशाी स्थिती. मानवी विकासासाठी लोकांकडे आजच्या काळानुसार मुलभूत ठरणाऱ्या सर्व गरजा भागवता येण्या इतके उत्पन्न हवे. यामध्ये भुकमुक्ती, वस्त्र, शिक्षण, निवारा,पिण्यायोग्य पाणी, स्वच्छता गृहे आणि विज हे घरोघरी उपलब्ध असणे आवश्यक आहे तरच सामाजिक न्याय प्रस्थापित करता येईल.

**संदर्भ सूची :**

१) राजकुतार वाईंगडे / विद्या म्होपरे, अर्थसंवाद - जुलै - सप्टेबर २०१३ पृष्ठ २०१
२) पी चिदंबरम, लोकसत्ता ( दि.१ डिसेंबर, २०१५)
३) गोपालकृष्ण शर्मा, स्मरनिका (५ आक्टोबर २००८) केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती - पृष्ठ १,२
४) कित्ता
५) कित्ता
६) सुभाष गवई, स्मरनिका (५ आक्टोबर २००८) पृष्ठ - १४५, १४५ ,१४७
७) कित्ता
८) सुरेखा फाकडे, अर्थसंवाद (आक्टोबर- डिसेंबर २०१६)
९) पी.एम. कडूरकर अर्थसंवाद (एप्रिल - जुन २०१७)
१०) सुखदेव थोरात, लोकसत्ता (दि. ५ जोनवारी २०१८)
११) रायखेलकर / दामजी (२०१३), भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद - पृष्ठ ३०३
१२) काटे / भोसले (२००८), भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन कोलहपूर

ISSN 2319 9318

* **संदर्भसुची**

१) रेश्मा घाणेकर (ऑगस्ट २०१७), योजना पृ. २१
२) विलास आहेर ( ऑग. २०१७), उदयोजक पृ ४४
३) प्रकाश गोयल (ऑग. २०१७ ), योजना पृ. ११
४) प्रकाश कुमार ( आँग २०१७) , योजन पृ २७
५) जे. एफ. पाटील ( जुलै - सप्टे २०१७ ) , अर्थसंवाद पृ १०१
६) धर्मा धेडे ( जुलै - सप्टे २०१७ ) , योजना पृ १७१
७) उपेंद्र गुप्ता ( जुलै - सप्टे २०१७) ,योजना पृ. ३४ ते ३७
८) गोविंद पटवर्धन ( २१ जाने २०१७) सकाळ